# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## गृहपाठ

## बी. ए. आर्थिक भूगोल

द्वितीय वर्ष (सत्र ४)

२०१६–१७

प्रती : १०००

# गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील सूचना वाचाव्यात व त्याप्रमाणे गृहपाठांचे काम करावे.

१. बी. ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमातील गृहपाठ लेखन हा महत्त्वाचा आणि अनिवार्य भाग आहे. गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने संबंधित विषयाचे पुस्तक वाचून मगच गृहपाठ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयाचा अभ्यास होतो. स्वयंअध्ययनाची सवय व्हावी व उत्तरपत्रिका लेखनाचा सराव व्हावा हाच गृहपाठ लेखनामागील हेतू आहे.

२. गृहपाठ लिहिताना पुस्तकातील मजकुराची केवळ नक्कल करू नये. विद्यार्थ्याने विषय समजून घेऊन गृहपाठ लिहिला आहे की नाही हे जाणीवपूर्वक पाहिले जाते आणि त्याप्रमाणे गुण दिले जातात.

३. गृहपाठ त्यांच्या अनुक्रमानुसार व सलग लिहावेत. एक गृहपाठ संपल्यावर ठळक रेघ मारून पुढील ओळीवर अथवा नव्या पानावर पुढील गृहपाठ लिहावा. उत्तरात लाल शाईचा वापर करू नये. योग्य समास सोडावा.

४. मोठ्या प्रश्नांचे उत्तर ४० ते ५० ओळीत असावे. गरजेनुसार जास्त चालेल. टीपा लिहा प्रत्येकी २०–२५ ओळीत उत्तरे असावे.

५. उत्तरात गरज नसताना १, २, ३....... असे आकडे घालण्याऐवजी योग्य परिच्छेद पाडावेत.

६. उत्तराला सुरुवात करताना प्रास्ताविक व उत्तराच्या शेवटी समारोप असेल तर ते उत्तर अधिक चांगले मानले जाते.

**७. सत्र ३ व सत्र ४ चे गृहपाठ एकत्रित दिलेले आहेत याची नोंद घ्यावी.**

८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'क्षेत्रीय कार्य' अथवा उपक्रम हा प्रश्न घालण्यात आला आहे. त्यासाठी अवांतर वाचन व सद्यःस्थितीतील घडामोडींचे निरीक्षण आवश्यक आहे.

## गृहपाठ सादर करण्याची मुदत

| सत्र | विना विलंबशुल्क | विलंब शुल्कासह |
|---|---|---|
| तिसरे | ३१ ऑक्टोबर २०१६ | १५ नोव्हेंबर २०१६ |
| चौथे | १५ मार्च २०१७ | ३१ मार्च २०१७ |

# आर्थिक भूगोल (GC-402)

**सत्र ४ : प्रकरण १ ते ५**

---

**प्र. १. आर्थिक भूगोल म्हणजे काय? आर्थिक भूगोलाची स्वरूप आणि व्याप्ती स्पष्ट करा? (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** आर्थिक भूगोल म्हणजे मानव व विविध पर्यावरणीय परिस्थितीमध्ये केल्या जाणाऱ्या मानवाच्या आर्थिक क्रिया यांचा अभ्यास होय.

**मुद्दे –** १. आर्थिक भूगोलाचे स्वरूप – प्रादेशिक विकासासाठी आवश्यक असलेले मूलभूत घटक, नैसर्गिक साधनसंपत्तीचे ज्ञान, आर्थिक व्यवसायाचे अध्ययन, २. आर्थिक भूगोलाची व्याप्ती – नैसर्गिक साधनसंपत्ती, मानव व पर्यावरणाशी असलेला सहसंबंध या व्यतिरिक्त केला जाणारा अभ्यास, नैसर्गिक साधनसंपत्तीचा मानवाने केलेला वापर व विकास, गतिमान शास्त्र, समारोप.

**प्र. २. उद्योगाच्या स्थानिकीकरणावर परिणाम करणाऱ्या घटकांची सविस्तर माहिती लिहा. (गुण : १५)**

**उत्तर – प्रस्तावना –** उद्योगांच्या स्थानांवरून त्यांच्यावर परिणाम करणाऱ्या घटकांच्या अनुकूलतेचा विचार करून स्थापन झालेल्या उद्योगांना उत्पादन खर्च, वाहतूक खर्च कमी येतो, कमी उत्पादन खर्च आलेला पक्का माल बाजारपेठेत स्पर्धा करू शकतो याचाच अर्थ उद्योगांचे स्थान योग्य आहे. यालाच उद्योगाचे स्थानिकीकरण म्हणतात.

**मुद्दे –** उद्योगाच्या स्थानिकीकरणावर परिणाम करणारे घटक – १. कच्चा माल – नाशवंत कच्चा माल, वजनाने जड व आकाराने मोठा कच्चा माल, वजनात घट होणारा कच्चा माल, वजनात घट न होणारा कच्चा माल, उद्योगामध्ये तयार होणारा पक्का माल. २. शक्ती साधने ३. मजूर पुरवठा – कुशल मजूर, व्यवस्थापकीय अधिकारी ३. भांडवल, ४. वाहतूक ५. बाजारपेठ ६. शासकीय धोरण ७. अन्य घटक ८. पाणीपुरवठा ९. हवामान. समारोप.

**प्र. ३. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या. (कोणतीही २) (गुण : १५)**

**१) शेतीचे प्रकार लिहून शेतीच्या प्रकारांची सविस्तर माहिती लिहा.**

**उत्तर – प्रस्तावना –** जमिनीची मशागत करणे म्हणजे शेती करणे.

**मुद्दे –** १. भटकी किंवा स्थलांतरित शेती २. सखोल उदरनिर्वाहाची शेती ३. व्यापारी धान्य शेती ४. मळ्याची शेती ५. मिश्र शेती ६. दुग्ध शेती.

**२) वनांचे प्रकार सांगून वैशिष्ट्ये व जागतिक वितरण स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** वनसंपदा पृथ्वीवरील एक महत्त्वाची साधनसंपदा असून, पर्यावरणाचा एक महत्त्वाचा घटक आहे.

**मुद्दे –** १. विषुववृत्तीय सदाहरित वने– स्थान, प्रदेश, वैशिष्ट्ये, मुख्य प्रजाती, आर्थिक महत्त्व २. उष्ण कटिबंधीय पानझडी अरण्ये (मोसमी अरण्य)– स्थान, प्रदेश, वैशिष्ट्ये, मुख्य प्रजाती, आर्थिक महत्त्व ३. सूचीपर्णी अरण्ये– स्थान, प्रदेश, वैशिष्ट्ये, मुख्य प्रजाती, आर्थिक महत्त्व, समारोप.

**३) आर्थिक भूगोलाचे इतर शाखांशी संबंध स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** आर्थिक भूगोलाची व्याप्ती विस्तारलेली आहे. त्यामुळे या विषयाच्या अभ्यासाकरिता इतर शास्त्रांची मदत घेतली जाते.

**मुद्दे –** १. आर्थिक भूगोल व भूरूपशास्त्र २. आर्थिक भूगोल व हवामान शास्त्र ३. आर्थिक भूगोल व वनस्पतीशास्त्र ४. आर्थिक भूगोल व प्राणिशास्त्र ५. आर्थिक भूगोल व गणितशास्त्र ६. आर्थिक भूगोल व पदार्थविज्ञान ७. आर्थिक भूगोल व सैन्यशास्त्र ८. आर्थिक भूगोल व अर्थशास्त्र ९. आर्थिक भूगोल व राजनीतिशास्त्र १०. आर्थिक भूगोल व समाजशास्त्र. समारोप.

**४) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप स्पष्ट करा.**

**उत्तर – प्रस्तावना –** एका देशाचा दुसऱ्या देशाशी होणारा व्यापार म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार होय. आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे जागतिक पातळीवर होणारे वस्तूंचे वितरण.

मुद्दे – १. अन्नपदार्थ/खाद्यपदार्थ २. कृषी उत्पादने ३. खनिजे ४. पक्क्या वस्तू ५. विकसित देश व आंतरराष्ट्रीय व्यापार ६. अविकसित देश व आंतरराष्ट्रीय व्यापार, समारोप.

**प्र. ४. टिपा लिहा. (कोणत्याही २) (गुण : १५)**

**१) वाहतुकीचे महत्त्व.**

**उत्तर – प्रस्तावना –** कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक विकासात वाहतूक महत्त्वाची असते. चांगल्या प्रगतशील वाहतुकीमुळे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय उद्दिष्टे साध्य होतात.

**मुद्दे –** १. काल–उपयोगिता २. वस्तू–उपयोगिता ३. विशेषीकरण ४. उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण ५. प्रादेशिक विकास, ६. उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण ७. मानवीजीवनस्तर व राहणीमान ८. प्रादेशिक संरक्षण व राष्ट्रीय एकात्मता ९. अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारवृद्धी. समारोप.

**२) भारतातील मृदा प्रकार**

**उत्तर – प्रस्तावना –** पृथ्वीवर आढळणारी मृदा मूलतः खडकांच्या विदारणाने तयार होते.

**मुद्दे –** १. तांबडी मृदा २. काळी मृदा किंवा रेगूर मृदा ३. लॅटेराइट मृदा ४. गाळाची मृदा ५. पर्वतीय मृदा ६. वाळवंटीय मृदा. समारोप.

**३) आर्थिक विकासातील उद्योगाचे महत्त्व**

**उत्तर – प्रस्तावना –** एखाद्या देशाचा आर्थिक विकास त्यांच्या उद्योगधंद्याच्या स्थितीवर अवलंबून असतो.

**मुद्दे –** १. उत्पन्नातील दरी कमी करणे २. बेकारीचे प्रमाण कमी करणे ३. उत्पादनात वाढ ४. शेती क्षेत्राचा विकास ५. स्वावलंबन ६. बचत ७. नैसर्गिक साधनांचा अधिकाधिक वापर ८. निर्यातीत वाढ ९. रोजगारात वाढ १०. मूलभूत सेवांचा विकास ११. औद्योगिक संस्कृतीचा विकास. समारोप.

**४) भारतातील रस्ते वाहतूक**

**उत्तर – प्रस्तावना –** भारतातील राष्ट्रीय महामार्गापासून ते गावपातळीवरील रस्त्यांचे प्रकार पहावयास मिळतात.

**मुद्दे –** १. राष्ट्रीय महामार्ग – प्रमुख राष्ट्रीय महामार्ग, सीमेजवळील महामार्ग, राज्यमहामार्ग, जिल्हा मार्ग, समारोप.

प्र. ५. कार्यक्षेत्र – भारतामधील टाटा आयर्न अँड स्टील कंपनी, जमशेदपूर, झारखंड याविषयी माहिती लिहा. (गुण : २०)

***